**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण,२०१२**

**राज्यातील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याची योजना**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो-२०१२/प्र.क्र.१५८/१२/क्रीयुसे-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
तारीख: ५ फेब्रुवारी,२०१४

**वाचा -**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीडाधो-२०११/ प्र.क्र.५५/११/क्रीयुसे-१, दिनांक १४ जून,२०१२.
२. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांचे पत्र क्रमांक-क्रीयुसे/क्रीडा धोरण/ २०१२-१३/का.६/ दिनांक ५ मार्च,२०१३.

**प्रस्तावना -**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण,२०१२ घोषित करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी करण्यास उपरोक्त दिनांक १४.६.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या क्रीडा धोरणातील मुद्दा क्रमांक-३.८ हा आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त करणा-या खेळाडूंना तसेच त्यांचे क्रीडा मार्गदर्शक / प्रशिक्षक यांना रोख पारितोषिके देऊन गौरव करण्याबाबत आहे. राज्यातील उल्लेखनीय कामगिरी करणा-या खेळाडूंना राज्य शासनातर्फे यापूर्वी वेळोवेळी रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आलेले आहे. त्याच धर्तीवर भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त करणा-या राज्यातील खेळाडूंना रोख पारितोषिक देण्याची कायमस्वरुपी योजना आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या राज्यातील खेळाडूंना व त्यांच्या मार्गदर्शकांना सोबतच्या परिशिष्ट-"अ" मधील नियमावलीनुसार प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यातील खेळाडूने आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये पदक प्राप्त केल्यानंतर त्याबाबतची माहिती संबंधित एकविध खेळाच्या राज्य संघटनेने पदक प्राप्तीच्या प्रमाणपत्रासह आयुक्त,

क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्याकडे १५ दिवसाच्या कालावधीत देण्याची व्यवस्था करावी. याशिवाय राज्यातील आंतरराष्ट्रीय पदकप्राप्त खेळाडूंची अद्ययावत माहिती प्रसार माध्यमाद्वारे प्रकाशित होणारी वृत्ते तसेच इंटरनेटद्वारे उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांनी क्रीडा व युवकसेवा संचालनालयातील जबाबदार अधिका-याकडे सोपवावी.

३. स्पर्धेमध्ये पदक प्राप्त केलेल्या राज्यातील खेळाडूची माहिती प्राप्त झाल्यावर त्या खेळाडूस राज्य शासनाच्यावतीने अभिनंदन करणारे पत्र आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्या स्वाक्षरीने आठ दिवसांच्या कालावधीत पाठविण्यात यावे व त्या पत्राची प्रत शासनास पाठविण्यात यावी.

४. या शासन निर्णयातील तरतूदी निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५. खेळाडूंना रोख पारितोषिक देण्याच्या योजनेकरिता होणारा खर्च "२२०४-क्रीडा व युवकसेवा-(०९) (०६) ऑलिम्पिक, राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धांमधील पदक विजेत्यांना रोख पारितोषिके देणे (२२०४ ५३२ १)-५० इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा.

६. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-५१७/व्यय-५, दिनांक २८.६.२०१३ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२०५११५७१८१५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Shantaram Parab

Digitally signed by Kiran Shantaram Parab
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Kiran Shantaram Parab
Date: 2014.02.05 12:00:49 +05'30'

**( कि. शां. परब )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२) मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे,
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,

७) नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,

८) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,

९) सर्व एकविध राज्य संघटना व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (संचालनालयामार्फत)

१०) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),

११) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),

१२) ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,

१३) मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

१४) मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

१५) कक्ष अधिकारी (कार्यासन-२३) व अवर सचिव (कार्यासन-२५).

१६) निवड नस्ती (कार्यासन-२४).

: प रि शि ष्ट-"अ" :

**शासन निर्णय क्रमांक-राक्रीधो-२०१२/(प्र.क्र.१५८/१२)/क्रीयुसे-२, दिनांक ५ फेब्रुवारी,२०१४ चे सहपत्र**

## राज्यातील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावली

**नियम-१** :- **शीर्षक** :- या नियमांना राज्यातील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याच्या योजनेचे नियम,२०१३ असे संबोधण्यात यावे.

**नियम-२** :- **उद्दिष्ट** :- आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या राज्यातील खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना प्रोत्साहनपर बक्षिस देवून त्यांचा गौरव करणे व त्यांना प्रोत्साहित करणे असे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**नियम-३** :- **पुरस्काराचे स्वरुप** :- आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त केलेल्या खेळाडूंना व त्यांच्या मार्गदर्शकांना त्यांच्या कामगिरीनुसार खालील प्रमाणे रोख पारितोषिक देण्यात येईल:-

(रुपये लाखात)

| अ. क्र. | स्पर्धा | संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | | रौप्य | | कांस्य | |
| | | खेळाडू (रोख पारितोषिक) | मार्गदर्शक (रोख पारितोषिक) | खेळाडू (रोख पारितोषिक) | मार्गदर्शक (रोख पारितोषिक) | खेळाडू (रोख पारितोषिक) | मार्गदर्शक (रोख पारितोषिक) |
| १ | ऑलिम्पिक | १००.०० | २५.०० | ७५.०० | १८.७५ | ५०.०० | १२.५० |
| २ | विश्व अजिंक्यपद | ३०.०० | ७.५० | २०.०० | ५.०० | १०.०० | २.५० |
| ३ | एशियन गेम्स | १०.०० | २.५० | ७.५० | १.८७५ | ५.०० | १.२५ |
| ४ | राष्ट्रकुल | १०.०० | २.५० | ७.५० | १.८७५ | ५.०० | १.२५ |
| ५ | युवा राष्ट्रकुल, एशियन चॅम्पियनशीप | ७.०० | १.८७५ | ५.०० | १.२५ | ३.०० | ०.७५ |
| ६ | युथ ऑलिम्पिक/ ज्युनिअर एशियन/ विश्व | ३.०० | ०.७५ | २.०० | ०.५० | १.०० | ०.२५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अजिंक्यपद स्पर्धा/ शालेय आशियाई स्पर्धा | | | | | | |
| ७ | पॅरा ऑलिम्पिक स्पर्धा | ३०.०० | ७.५० | २०.०० | ५.०० | १०.०० | २.५० |
| ८ | पॅरा एशियन स्पर्धा | ३.०० | ०.७५ | २.०० | ०.५० | १.०० | ०.२५ |

**नियम-४** :- **पात्रतेचे निकष** :- (i) खेळाडूचे / मार्गदर्शकाचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे.

(ii) खेळाडूने नियम-३ मध्ये नमूद केलेल्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये पदक संपादन करणे आवश्यक आहे.

(iii) क्रीडा मार्गदर्शकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देताना संबंधित खेळाडूंच्या मूळ क्रीडा मार्गदर्शकाचा विचार करण्यात यावा. सदर क्रीडा मार्गदर्शक हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. तसेच पुरस्कारार्थी खेळाडूने त्याच्या मूळ क्रीडा मार्गदर्शकाचे नाव स्वत: प्रमाणित करुन देणे आवश्यक आहे.

**नियम-५** :- **रोख पारितोषिक मंजूर करण्याचे अधिकार** :- वरील नियम-३ मध्ये दर्शाविलेल्या कामगिरीची पडताळणी करुन संबंधित खेळाडूस रोख पारितोषिक मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांना राहतील.

**नियम-६** :- **आहरण व संवितरण अधिकारी** :- या योजनेसाठी आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**नियम-७** :- **नियम शिथिल करणे / बदल करणे** :- या नियमावलीमधील कोणताही नियम शिथिल करणे, त्यात अंशत: किंवा पूर्णत: बदल करणे, नवीन नियम समाविष्ट करणे याबाबतचे सर्व अधिकार शासनास राहतील.

-------